# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.11.2025** **वार- मंगळवार**

---

**आरक्षणाची सोडत**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत आज जाहीर झाली. राज्य निवडणूक आयोगाच्या उपस्थितीत ही सोडत गणेश कला क्रीडा रंगमंच इथं पार पडली. यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिलांसाठी राखीव जागांचं आरक्षण निश्चित करण्यात आलं. पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगरसेवकांची संख्या 165 असून, 41 प्रभाग आहेत. 165 नगरसेवकांच्या जागांपैकी 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळं 83 नगरसेविका आणि 82 नगरसेवक असणार आहेत. अनुसूचित जातींसाठी 22 तर अनुसूचित जमातींसाठी 2 जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

**आरक्षण सोडत**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठीची आरक्षण सोडत प्रक्रियाही आज चार टप्प्यात पार पडली. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अखेर सर्वसाधारण महिलांसाठी राखीव जागा निश्चित करण्यात आल्या. शहरात एकंदर 32 प्रभाग असून यामध्ये 128 जागा आहेत. अनुसूचित जातीसाठी 20 जागा असून यापैकी 10 जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत तर अनुसूचित जमातीसाठी 3 जागा असून यापैकी 2 जागा महिलांसाठी असतील. तसंच मागासवर्गीय प्रवर्गासाठी 32 जागा असून यापैकी निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत. तर सर्वसाधारण गटासाठी 71 जागा असून यापैकी 31 जागा महिलांसाठी आरक्षित आहेत.

**पॉश**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणूक प्रतिबंध, मनाई आणि निवारण अधिनियमा अंतर्गत जिल्ह्यातल्या सर्व शासकीय तसंच खाजगी कार्यालयांमध्ये अंतर्गत विशाखा समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. ज्या ठिकाणी 10 हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, अशा सर्व कार्यालयांना हे बंधन आहे. सर्व खाजगी आस्थापनांनी त्यांच्या अंतर्गत समित्यांची ऑनलाइन नोंदणी करणेही आवश्यक आहे.

**रब्बी**

राज्यात आतापर्यंत सुमारे 8 लाख हेक्टरवर रब्बी पिकांची लागवड झाली असून, ज्वारीची पेरणी सरासरी क्षेत्राच्या 26 टक्क्यांपर्यंत तर गव्हाची पेरणी 3 टक्के झाली आहे. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता चांगली असल्यानं गहू, हरभरा आणि मक्याचं क्षेत्र वाढलं आहे. या हंगामासाठी 65 लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी होण्याची

अपेक्षा आहे, अशी माहिती कृषी संचालक रफीक नाईकवडी यांनी दिली आहे. शेतकऱ्यांना 14 लाख टन बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## कार्तिकी यात्रेनिमित्त वाहतुकीत बदल

श्री क्षेत्र आळंदी इथं होणाऱ्या कार्तिकी यात्रेनिमित्त आणि संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या 750 व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी वाहतुकीत बदल केला आहे. उद्यापासून ते 20 नोव्हेंबरपर्यंत हा बदल असणार आहे. अत्यावश्यक सेवेतील आणि दिंडीतील वाहने वगळून आळंदी शहरात सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. कार्तिकी यात्रेनिमित्त आळंदी आणि देहू परिसरात 10 ते 15 लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे.

## पीएमसी

पुणे महापालिकेच्या पथारीवाले बंदी धोरणानुसार चौकांपासून 50 मीटर अंतरापर्यंत व्यवसाय करण्यास बंदी आहे, वाहतुकीला अडथळा होत असल्यानं अश्या व्यावसायिकांचं इतर ठिकाणी स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी लवकरच सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचं पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितलं.

## अपघात

भरधाव मोटारीनं सहा वाहनांना धडक दिल्याची घटना काल रात्री हडपसरमधल्या हांडेवाडी परिसरात घडली. अपघातात तिघे जण जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मोटारचालकाला ताब्यात घेण्यात आलं आहे.

## क्रीडा

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या वतीनं किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी स्पर्धा पिंपरी चिंचवडमध्ये बोपखेल इथं पार पडली. किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघानं अहमदनगरचा 39-20 पराभव केला आणि "स्व. राजश्री चंदन पांडे चषका बरोबरच आमदार चषकावर पहिल्यांदा आपलं नाव कोरलं. किशोर गटाच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या परभणीनं पालघरला 42-30 असं नमवून "स्व. प्रभाकर नागो पाटील" चषका बरोबर आमदार चषक पटकावला.

## हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 29 तर किमान तापमान 13 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

# नमस्कार.